# महात्मा फुले कृषी विद्यापीठाद्वारे विकसित पिकांचे सुधारित वाण

डॉ. शरद गडाख,
डॉ. विठ्ठल शिर्के

परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठामध्ये संपन्न झालेल्या संयुक्त कृषी संशोधन व विकास समितीच्या बैठकीमध्ये महात्मा फुले कृषी विद्यापीठाने विकसित केलेले ७ सुधारीत / संकरित वाणांना मान्यता मिळाली आहे. गहू आणि दुधी भोपळा या पिकांचे वाण राष्ट्रीय स्तरावर शिफारशीत करण्यात आले आहेत.



## गहू

**फुले शाश्वत (एनआयएडब्लू ४११४):** हा वाण राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्रप्रदेश व तामिळनाडू राज्यासाठी बागायती उशिरा पेरणीकरिता प्रसारित करण्यात आला आहे.



## संकरित बाजरी

**फुले मुक्ताई (डीएचबीएच-२१०७५) :** अधिक उत्पादन देणारा, गोसावी व करपा रोगास प्रतिकारक्षम वाण खरीप हंगामात महाराष्ट्र राज्यात लागवडीसाठी प्रसारित करण्यात आला आहे.



## जांभूळ

**फुले नीलकंठ (आरएचआरजे-७/१):** फळांचा मोठा आकार, उत्कृष्ट टिकवण आणि जास्त उत्पादन असल्याने हा वाण पश्चिम महाराष्ट्रात लागवडीसाठी प्रसारित करण्यात आला आहे.



## दुधी भोपळा

**फुले अनमोल (आर.एच.आर. बी.जी.-३५):** एकसारखी दंडगोलाकार, हिरव्या रंगाची फळे आणि अधिक उत्पादन देणारा हा वाण महाराष्ट्रासह पंजाब, बिहार आणि उत्तर प्रदेश राज्यात लागवडीसाठी राष्ट्रीय स्तरावर प्रसारित करण्यात आला आहे.



## भात

**फुले मावळ - ८ (व्हीडीएन-२००३):** अधिक धान्य उत्पादन देणारा, हळवा व लांबट बारीक दाण्याचा वाण खरीप हंगामात पश्चिम महाराष्ट्रात लागवडीसाठी प्रसारित करण्यात आला आहे.



## पालेभाजी करडई

**फुले अभिलाषा (एसएसएफ-०७):** हिरव्या पानाचे अधिक उत्पादन देणारा वाण पश्चिम महाराष्ट्रात पालेभाजीसाठी प्रसारित करण्यात आला आहे.



## भेंडी

**फुले गायत्री (आरएचआरओकेएच-०१):** हिरव्या रंगाची, मध्यम आकाराची फळे आणि अधिक उत्पादन देणारा संकरित वाण महाराष्ट्रात लागवडीसाठी प्रसारित करण्यात आला आहे.



## मोसंबी

**फुले रसिका (सिलेक्शन-७):** हा वाण जास्त रसाचे प्रमाण आणि अधिक उत्पादनक्षम असल्याने पश्चिम महाराष्ट्रात लागवडीसाठी शिफारस करण्यात आला आहे.

## कारळा फुले कळसूबाई (आयजीपीएन-१८३४)

अधिक धान्य उत्पादनक्षम, भुरी, मूळ व खोड कुजव्या रोगास प्रतिकारक्षम वाण खरीप हंगामात महाराष्ट्र राज्यात लागवडीसाठी प्रसारित करण्यात आला आहे.

☏ ०२४२६- २४३८६१
कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्र, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी
(डॉ. शरद गडाख हे महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू आणि डॉ. विठ्ठल शिर्के हे संशोधन संचालक आहेत)